मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पाण्यावरून महापालिका पीएमआरडीए आमने-सामने

## पीएमआरडीए कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणे महापालिकेला शक्य होणार नाही : आयुक्त शेखर सिंह यांनी पीएमआरडीए प्रशासनाला लेखी पत्राद्वारे कळविले

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराला गेल्या पावणेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू असून लोकसंख्येत झपाट्याने वाढत आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण येत असून पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करणे महापालिकेस जिकिरीचे होत आहे. त्यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणे महापालिकेला शक्य होणार नसल्याचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पीएमआरडीए प्रशासनाला लेखी पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे पाण्यावरून महापालिका आणि पीएमआरडीए आमने-सामने येण्याची शक्यता आहे.

पीएमआरडीएने पाण्याची उपलब्धता असल्याशिवाय मोठ्या बांधकाम आणि समूह गृहबांधणी प्रकल्पांना बांधकाम परवानगी न देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यामध्ये सुधारणा करत पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदांनी संबंधित गृहप्रकल्पांना पाणी उपलब्ध करून देण्यासंदर्भातील 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले तर, बांधकाम प्रस्ताव मंजूर करण्याचा निर्णय पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी घेतला आहे. प्राधिकरणाच्या हद्दीतील पाच किलोमीटर परिघाच्या क्षेत्रातील ग्रामीण भागांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी महापालिका, नगरपालिका आणि जल जीवन प्राधिकरणाची असून तसा शासन निर्णय आहे. त्यामुळे संबंधित शासकीय यंत्रणांनीच पाणीपुरवठा करणे बंधनकारक आहे. डॉ. म्हसे यांनी महापालिका आयुक्त सिंह यांना दोन सप्टेंबरला पत्र पाठवून प्राधिकरणाच्या हद्दीतील पाच किलोमीटर परिघाच्या क्षेत्रातील ग्रामीण भागांना पाणीपुरवठा महापालिकेने करावा, अशी मागणी केली.




### हद्दीबाहेर पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी महापालिका स्वीकारत नाही

» पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची कमी उपलब्धता यामुळे पीएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात पाणीपुरवठा करणे महापालिकेस शक्य होणार नाही. पीएमआरडीए हद्दीतील पाणीपुरवठ्यासाठी पीएमआरडीए व तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याची कार्यवाही करावी. हद्दीपासून पाच किलोमीटरपर्यंतच्या बांधकाम प्रकल्पांना पाणीपुरवठा करण्याची कोणतीही जबाबदारी महापालिका स्वीकारत नसल्याचे महापालिका आयुक्त सिंह यांनी पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. म्हसे यांना पत्राद्वारे कळविले आहे.

### पीएमआरडीएचा बांधकामांना परवानगी देण्याचा सपाटा

» पीएमआरडीएने पाण्याचे कोणतेही नियोजन केले नसताना बांधकाम परवानगी देण्याचा सपाटा सुरू केला आहे. बांधकाम परवानगीसाठी १३३ प्रकारची कागदपत्रे द्यावी लागत होती. यामध्ये सुटसुटीतपणा आणून कागदपत्रांची संख्या कमी केली आहे. आता ८९ कागदपत्रे द्यावी लागत आहेत. त्यामुळे पीएमआरडीएकडे अवघ्या दीड महिन्यात बांधकाम परवानगीसाठी १२५ अर्ज आले आहेत. महापालिकेचे पत्र अद्यापपर्यंत आपल्याकडे आले नाही. पत्र प्राप्त झाल्यानंतर अधिक भाष्य करणे योग्य राहील असे पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे म्हणाले.

---

# 'स्वच्छता ही सेवा' उपक्रमाअंतर्गत 1450 सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी

## पिंपरी चिंचवड नगरी ही स्वच्छ व सुंदर करण्यासाठी कर्मचा-यांनी महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आरोग्य उत्तम रहावे याकरीता महापालिकेच्या वतीने त्यांच्यासाठी वर्षातून दोन वेळा त्यांच्या आरोग्याची तपासणी करण्यात येते. यामुळे त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहणे शक्य होत असून त्यांच्यात आरोग्याबाबत जागरुकता निर्माण होते. भविष्यात देखील सफाई कर्मचाऱ्यांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले आणि आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छाही दिल्या

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत "स्वच्छता ही सेवा" ह्या पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवड्यात "स्वभाव-स्वच्छता, संस्कार- स्वच्छता" यावर आधारित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आज सफाई कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे बोलत होते.



आजच्या शिबिरात आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, थेरगाव रुग्णालयाचे डॉ. राजेंद्र फिरके, भोसरी रुग्णालयाचे डॉ. शिवाजी ढगे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्याधिकारी कुंडलिक दरवडे, सुधीर वाघमारे, राजू साबळे, शांताराम माने, के. पी. एम. जी. संस्थेचे विनायक पदमाने, आरोग्य विभागाच्या शितल पवार तसेच आरोग्य कर्मचा-यांची उपस्थिती होती.

महानगरपालिकेच्या वतीने आरोग्य सेवकांसाठी आवश्यक ती साधने पुरविण्यात आलेली असून त्यांचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी वर्षातून दोन वेळा त्यांच्यासाठी आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते, त्यांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय उपचार,मार्गदर्शन व तज्ञांचा सल्ला देण्यात येतो, त्यामुळे त्यांचे आरोग्य निरोगी राहून त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होते, असे मत आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी व्यक्त केले.

---

# आता यांत्रिकी पद्धतीने रस्ते सफाईसाठी नियमावली

## आरोग्य विभागाने नियमावली तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील १८ मीटरपेक्षा जास्त रुंदी असलेल्या रस्त्यांची सफाई यांत्रिकी पद्धतीने करणाऱ्या ठेकेदाराने किलोमीटर वाढविण्यासाठी रस्ता साफ न करताच रस्ते सफाई वाहन (रोडस्वीपर) पळवल्याचे समोर आल्यानंतर आता आरोग्य विभागाने नियमावली तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. सफाई वाहनाच्या यंत्रणेतही बदल केले जाणार आहेत.



महापालिकेमार्फत शहरातील १८ मीटर रुंदीचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने साफ केले जातात. शहराचे दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग केले आहेत. फेब्रुवारीपासून यांत्रिकी पद्धतीने चार विभागांत काम सुरू असून, त्यासाठी चार संस्था कार्यरत आहेत. प्रत्येक विभागात दोन मोठी, दोन मध्यम रस्ते सफाई वाहने, एक पाण्याचा टँकर अशा वाहनांचा समावेश आहे. या वाहनांचे संचलन करण्यासाठी प्रत्येक विभागात ३२ सफाई कर्मचारी, नऊ वाहनचालक, १० ऑपरेटर, चार मदतनीस अशा ५५ कामगारांद्वारे कामकाज करणे अपेक्षित आहे. प्रत्येक रस्ते सफाई वाहनाद्वारे दररोज ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सफाई करणे आवश्यक आहे. १८ मीटर व त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्ते, बीआरटीएस, महामार्गावरील पदपथ आणि सेवा रस्त्यांच्या दोन्ही बाजूंची आठवड्यातून तीन वेळा, मुख्य मार्गावरील मधल्या रस्त्यांची, रस्त्याच्या कडेच्या भिंतीच्या परिसराची आठवड्यातून एक वेळा सफाई करणे आवश्यक आहे.

रस्ते सफाई न करता ठेकेदार सफाई वाहन किलोमीटर वाढविण्यासाठी पळवत महापालिकेची तिजोरी साफ करत होते. त्यामुळे महापालिकेने अँन्थोनी वेस्ट हॅण्डलिंग सेल लिमिटेडला पाच, लायन सर्व्हिसेसला चार, रिल वेस्ट मॅनेजमेंट एलएलपीला तीन, तर भूमिका ट्रान्स्पोर्टला दोन नोटिसा बजाविल्या. लायन सर्व्हिसेसला ५० हजार रुपयांचा दंडही ठोठावला. भविष्यात असा प्रकार होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने सर्व ठेकेदार प्रतिनिधींची बैठक घेतली. यापुढे चुकीचे काम केल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा दिला. तसेच रस्ते सफाईसंदर्भात नव्याने नियमावली करण्याचा निर्णय घेतला.

# भिडेवाडा स्मारकाचे काम सुरू असूनही पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन, विरोधकांची टीका

## भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज भूमिपूजन होणार आहे.


**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केलेल्या भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ सप्टेंबर रोजी भूमिपूजन होणार आहे. पण भिडेवाड्यात राष्ट्रीय स्मारकाचे प्रत्यक्ष काम सुरू झाले असून आता त्याचे भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. यावरून वादाला तोंड फुटले आहे.

भिडेवाड्याचे काम सरकारच्या प्रयत्नांमुळे नाही, तर न्यायालयाच्या आदेशामुळे सुरू झाले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी केली आहे. याचे श्रेय घेण्याचा भाजपचा हा अट्टाहास आहे, असेही ते म्हणाले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी प्रशासनाच्या निर्णयावर टीका केली आहे. भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम सुरू झाले आहे. अशा स्थितीत या कामाचे पुन्हा भूमिपूजन करणे योग्य नाही. भिडेवाड्याचे काम शासनाच्या प्रयत्नाने नाही तर न्यायालयाच्या आदेशामुळे सुरू झाले आहे. भाजप आणि आरएसएसच्या विचारानुसार पंतप्रधान मोदी फुलेंच्या विचारसरणीचा अवमान करत असल्याचा आरोप जगताप यांनी केला. तसेच आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुका लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रोचे उद्घाटन होत आहे. याआधीही नरेंद्र मोदी यांनी पुण्यात येऊन विविध मेट्रो मार्गांचे उद्घाटन केले होते. प्रत्येक निवडणुकीपूर्वी पुण्यात येऊन मेट्रोच्या छोट्या टप्प्याचे उद्घाटन करण्याची नरेंद्र मोदींची स्टाईल पुणे शहरात चेष्टेचा विषय ठरल्याचा आरोप जगताप यांनी केला आहे.

फुले दाम्पत्याने १८८५ मध्ये भिडेवाडा येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. स्वत: पूजाअर्चा आणि कर्मकांडाला विरोध करत सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. भिडेवाडा स्मारकाचे भूमिपूजन न करता येथे पालिकेच्या वतीने काम सुरू करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात हे काम थांबले होते. पुणे दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भिडेवाड्याच्या कामाचे भूमिपूजन करण्याचे नियोजन आहे. त्यावरून विरोधकांनी टीका केली आहे.



### मंडई मेट्रो स्टेशनला महात्मा फुले मंडई नाव देण्याची मागणी

» राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव ठाकरे यांनीही मंडईतील पुणे मेट्रो स्थानकाला महात्मा फुले मंडई स्थानक नाव देण्याची मागणी केली आहे. तर रुबी क्लिनिक मेट्रो स्टेशनला माता रमाबाई आंबेडकर मेट्रो स्टेशन असे नाव देण्यात यावे, अशी मागणी मातंग एकता आंदोलनाच्या वतीने माजी नगरसेवक अविनाश बागवे यांनी केली आहे.

### हा तर फुले दाम्पत्याच्या विचारांचा अपमान

» महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये भिडेवाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. उपासना आणि कर्मकांडांना विरोध करत त्यांनी सत्यशोधक समाजाचीही स्थापना केली. फुले दाम्पत्य सत्यशोधक असल्याने त्यांनी स्मारकाचे भूमिपूजन न करता थेट काम सुरू केल्याचा दावा पुणे महापालिकेने काही दिवसांपूर्वी केला होता, पण आता या स्मारकाची पायाभरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २६ सप्टेंबरला करण्याची घोषणा प्रशासनाने केली आहे. प्रशासनाची ही घोषणा म्हणजे फुले दाम्पत्याच्या विचारांचा अपमान असल्याची टीका जागरूक पुणकरांकडून केली जात आहे.

> “ आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुका लक्षात घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रोचे उद्घाटन होत आहे. याआधीही नरेंद्र मोदी यांनी पुण्यात येऊन विविध मेट्रो मार्गांचे उद्घाटन केले होते. प्रत्येक निवडणुकीपूर्वी पुण्यात येऊन मेट्रोच्या छोट्या टप्प्याचे उद्घाटन करण्याची नरेंद्र मोदींची स्टाईल पुणे शहरात चेष्टेचा विषय ठरली आहे.
>
> - प्रशांत जगताप, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट

# महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रांना उस्फूर्त प्रतिसाद

## केंद्राच्या माध्यमातून 1 एप्रिल 2024 ते 23 सप्टेंबर 2024 या कालावधीत 36 हजार 538 दाखले काढण्यात आले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून १ एप्रिल २०२४ ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत ३६ हजार ५३८ दाखले काढण्यात आले आहेत, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली.महापालिकेच्या वतीने नागरी सुविधा केंद्रांच्या माध्यमातून विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने आदी सेवा प्रदान केल्या जात आहेत.

नागरिकांना आवश्यक असणाऱ्या सेवेचा अर्ज ऑनलाईन भरण्यात येतो आणि नागरिक आवश्यक त्या सेवा कोणत्याही अडथळ्याशिवाय प्राप्त करू शकतात. ७/१२ चा उतारा, रहिवास प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र अशी अनेक उपयुक्त कागदपत्रे या माध्यमातून नागरिक प्राप्त करीत आहेत. यासाठी लांबच लांब रांगा लावायची गरज नाही, तसेच प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी कार्यालयात असंख्य फेऱ्याही मारण्याची आवश्यकता भासत नसल्याने वेळेची बचत होते.

महापालिकेच्या वतीने एकूण ९४ नागरी सुविधा केंद्रे उभारण्यात आली असून दाखले काढण्यासाठी नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिक या केंद्रांवर जाऊन आवश्यक दाखले काढत आहेत. महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्राच्या माध्यमातून १ एप्रिल २०२४ ते २३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत विविध दाखले देण्यात आले आहेत.

यामध्ये भाडेकरू नोंदणी, रसवंतीगृह चालू करण्याकरिता परवाना, अग्निवर्दी प्रमाणपत्र (फायर अटेंडन्स सर्टिफिकेट), एल. पी. जी बॅक रेटिक्युलेशन यंत्रणा, नवीन नळजोड देणे, हॉटेल नूतनीकरण, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना नूतनीकरण करणे, नळ कनेक्शन बंद करून अनामत परत करणे, हॉस्पिटल रजिस्ट्रेशन परवाना देणे (१ ते १० बेड ), सिनेमागृह नूतनीकरण, ड्रेनेज बांधकाम परवानगी ना हरकत दाखला देणे, पेट्रोल पंप ना हरकत दाखला, महापालिका हॉल व मैदाने भाड्याने देणे, अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करणे, इमारत प्लॅन मंजुरी तात्पुरता ना हरकत दाखला, झोपडी हस्तांतर करून फोटोपास, उद्योग धंदा परवाना नूतनीकरण, जलनिस्सारण जोडणी देणे,असे विविध दाखले देण्यात आले आहेत

# अतिपर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी खबरदारी घ्यावी; रेड अलर्टचा इशारा !

## असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय हवामान विभागाने पुणे जिल्ह्याकरीता रेड अलर्ट आणि 26 सप्टेंबर रोजी यलो अलर्टचा इशारा दिला असून नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.



सद्यस्थितीमध्ये जिल्ह्यातील सर्व धरणे भरलेली असून धरणक्षेत्रात सततधार पडत असलेल्या पावसामुळे पाणी पातळीमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. पाणलोट क्षेत्रामधील अतिपर्जन्यमानामुळे धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानूसार विसर्ग कमी किंवा जास्त होण्याची शक्यता आहे.

तरी नदी पात्रातील वाढ होणाऱ्या पाण्याच्या अनुषंगाने सर्व विभागांनी नदीकाठच्या झोपड्या, वस्त्या व परिसरात आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. व्यक्ती, साहित्य, वाहने, जनावरे, टपऱ्या, दुकाने इत्यादी तात्काळ हलविण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी इतर संबंधित विभागाच्या मदतीने पर्जन्याच्या अनुषंगाने वेळोवेळी गावनिहाय आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तात्काळ कराव्यात, असेही निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने देण्यात आले आहेत.

राज्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर पुण्यासह घाटमाथ्यावर आणि संपूर्ण जिल्ह्याला 'रेड अलर्ट' दिला आहे. त्यामुळे पुणे शहरातही सावधानतेचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे. शहरात 60 ते 100 मिमीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तसेच, 26 व 27 रोजी शहरात 'यलो अलर्ट' म्हणजे 20 ते 30 मिमी पावसाचा अंदाज आहे. त्यानंतर मात्र पावसाचा जोर कमी होणार आहे.

आगामी तीन-चार दिवस महाराष्ट्रात आणि पुण्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्राची निर्मिती झाली आहे. या क्षेत्राच्या प्रभावामुळे राज्यात 28 सप्टेंबरपर्यंत पावसाचा अंदाज आहे, अशी माहिती ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिली आहे.

# भोसरी विधानसभेत विजयासाठी मविआची शक्ती एकवटली!

## महाविकास आघाडीच्या एकजुटीने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली : एकनाथ पवार

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या दहा वर्षात भ्रष्टाचार, मनमानी कारभार दहशत आणि एकाधिकारशाहीचा कारभार सुरू आहे. करदात्या नागरिकांच्या खिशातील पैसा जागोजागी ओरबडला जात असून, नागरिक पाणी, वीज, रस्ते, खड्डे या प्रश्नांनी वैतागलेले आहेत. या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी महाविकास आघाडीने 'परिवर्तन' करायचे ठरवले आहे. हे परिवर्तन करण्यासाठी महाविकास आघाडीची शक्ती एक दिलाने लढणार असून त्यासाठी आमच्यामध्ये एकजूट आहे. आमची ही एकजूट पाहून आता विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली असल्याचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) राज्य संघटक एकनाथ पवार म्हणाले.



शिवसेना राज्य संघटक तसेच पिंपरी चिंचवड महापालिकेचे एकनाथ पवार यांच्या निवासस्थानी भोसरी विधानसभा महाविकास आघाडीची बैठक संपन्न झाली. यावेळी पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अजित गव्हाणे, शिवसेना पुणे जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, माजी नगरसेवक रवी लांडगे, माजी नगरसेवक आणि भोसरी विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट आदी उपस्थित होते.

यावेळी एकनाथ पवार म्हणाले महाराष्ट्राच्या विधानसभेचे बिगुल वाजण्यासाठी अवघ्या काही दिवसांचा अवधी शिल्लक आहे. त्यामुळे राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे . विरोधकांकडून जाणीवपूर्वक काही गोष्टींना खतपाणी दिले जात आहे. उगाचच काही वावड्या उठवल्या जात आहेत. मात्र महाविकास आघाडीमध्ये फूट पाडणे आता विरोधकांना शक्य नाही.

> "भोसरी मतदारसंघांमध्ये गेल्या दहा वर्षात कोट्यावधी रुपयांचा निधी महापालिकेने दिला. मात्र त्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे झाला नाही. हे या मतदारसंघांमध्ये फिरल्यानंतर नक्कीच दिसून येते. नुकत्याच झालेल्या पावसाळ्यात रस्त्यांची दुरावस्था दिसून आली. संपूर्ण मतदारसंघ खड्डेमय झाला. यातूनच झालेल्या कामाची गुणवत्ता आणि त्यावर खर्च करण्यात आलेला पैसा यातील तफावत दिसून येते. नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. सोसायट्यांमध्ये पाण्याचा खूप मोठा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांवर 'परिवर्तन' हे एकच उत्तर आहे.
>
> **- अजित गव्हाणे, माजी अध्यक्ष, स्थायी समिती पिंपरी चिंचवड महापालिका.**

महाविकास आघाडी एक दिलाने, एकजुटीने सर्वत्र काम करणार आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघही त्याला अपवाद राहणार नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून जो उमेदवार भोसरी विधानसभेसाठी ठरविण्यात येईल त्या उमेदवाराचे आम्ही एकजुटीने काम करणार आहोत.

दरम्यान या बैठकीचा फोटो सोशल मीडियावर प्रचंड "व्हायरल" झाला. महाविकास आघाडीच्या एकजुटीचे नेटकऱ्यांनी स्वागत केले. भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेनेची मोठी ताकद आहे. शिवसेनेला मानणारा वर्ग हा कधीच पक्षाशी, पक्षाच्या तत्त्वांशी गद्दारी करत नाही. हा या मतदार संघाचा इतिहास आहे. शिवसेनेचा प्रत्येक कार्यकर्ता- पदाधिकारी या मतदारसंघात महाविकास आघाडीचेच काम करेल, असा विश्वास एकनाथ पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

# पीएमआरडीएच्या 3 हजार 838 कोटींच्या अर्थसंकल्पास मंजूरी

## सांस्कृतिक शहर म्हणून पुण्याची ओळख कायम रहावी असे नियोजन करा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**पिंपरी | प्रतिनिधी**

अटल सेतू, मुंबई-पुणे महामार्ग मिसिंग लिंक सारख्या प्रकल्पांमुळे पुणे आणि मुंबई ही महानगरे जवळ आली आहेत. त्याचा परिणाम म्हणून पुणे परिसरात मोठ्या प्रमाणावर विकास होत आहे. विकास प्रक्रियेच्या नियोजनाची जबाबदारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची असून प्राधिकरणाने पुणे शहराची सांस्कृतिक शहर म्हणून ओळख कायम ठेऊन शहराचा विकास व्हावा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेतेखाली आज पुणे महानगर विकास प्राधिकरणाची बैठक पार पडली. बैठकीत पीएमआरडीएच्या ३ हजार ८३८ कोटी ६१ लाखांच्या अर्थसंकल्पास मंजूरी देण्यात आली.



मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की मुख्य पुणे शहर दाटीवाटीचे झाले आहे, ही परिस्थिती बदलण्यासाठी नवीन विकसित होणाऱ्या भागात मोकळ्या जागा राहतील, याची काळजी घ्या. पुण्याच्या विकासाचे नियोजन करतांना तज्ज्ञांची मदत घ्या, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. पुण्यात होणाऱ्या कन्व्हेशन सेंटर हे जागतिक दर्जाचे होण्यासाठी नियोजन करावे, गुंठेवारी अधिनियमातील नियमितीकरणाचे शुल्क कमी करुन नागरिकांना दिलासा द्यावा, हे शुल्क भरण्यासाठी ३१ मार्च पर्यंत विशेष सवलत उपलब्ध करुन जास्तीत जास्त जमिनी नियमित करुन घ्याव्यात अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले, की पुणे महानगराचा प्रारुप विकास आराखडा तयार करतांना जास्तीत

> "पिंपरी-चिंचवडमधील इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजना आणि औद्योगिक प्रदर्शन केंद्रासाठी आम्ही सातत्याने आग्रही आहोत. नुकतेच पर्यावरण विभागाने नदी सुधार प्रकल्पासाठी मंजुरी दिली. त्यानंतर आता पीएमआरडीएच्या माध्यमातून संबंधित प्रकल्पाला निधी उपलब्ध करण्यात आला आहे. शहराच्या विकासामध्ये सदर प्रकल्प 'माईलस्टोन' राहतील, यात शंका नाही.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.**

जास्त नागरिकांना फायदा होईल, अशा प्रकारे तयार करावा. तसेच पीएमआरडीएच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या परवडणाऱ्या घरांच्या बांधकामाची गुणवत्ता चांगली राहिल, याची काळजी घ्यावी. घरांच्या गुणवत्तेत हयगय करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. तयार असणाऱ्या एकूण ४ हजार ८८६ घरांपैकी उरलेल्या १ हजार ६२० घरांची सोडत लवकरच काढण्यात यावी. तसेच दुसऱ्या टप्प्यातील ६ हजार घरांच्या बांधकामास वेग देण्यात यावा. सोबतच या घरांचे बांधकाम करतांना उद्यान, मोकळी जागा सारख्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आजच्या बैठकीत ५ कोटी ७५ लाखांचा शिलकीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यावेळी पुणे महानगर प्रदेशासाठी ठाणे शहराच्या धर्तीवर आपत्ती प्रतिसाद पथकाच्या स्थापनेस आणि १० ठिकाणी नवीन अग्निशमन केंद्र निर्मितीस मान्यता देण्यात आली. ११ ठिकाणी मलनिस्सारण योजना तयार करण्यास, लोणावळा येथे टायगर व लायन्स पॉईंट येथे ग्लास स्कायवॉक तयार करण्यास या बैठकीत मंजूरी देण्यात आली.

# पंतप्रधानांच्या हस्ते मेट्रोचे लोकार्पण अन् भूमिपूजन

## टिळक रस्त्यावरील स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर पंतप्रधान मोदींची सभा होणार

**पुणे | प्रतिनिधी**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर येणार आहेत. शहरात उद्या कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच पंतप्रधान जाणाऱ्या रस्त्यांची डाकडूचीही करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाकडून रस्त्यांची पाहणी केली जात आहे. उद्या मेट्रोचे लोकार्पण आणि नव्या मार्गाचे भूमिपूजन पतंप्रधानांच्या हस्ते होणार आहे. तसेच टिळक रस्त्यावरील स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर मोदींची सभा होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आलेली आहे.



पंतप्रधान मोदी सायंकाळी ५.३० वाजता पुणे विमानतळावर दाखल होणार आहेत. सायंकाळी ६ वाजता विमानतळावरून स्वारगेटला मेट्रोच्या लोकार्पणासाठी जाणार आहेत. त्याठिकाणी मोदींच्या हस्ते स्वारगेट ते शिवाजीनगर या मेट्रोचा लोकार्पण सोहळा होईल. तर स्वारगेट ते कात्रज मेट्रोचा भूमिपूजन सोहळा होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता टिळक रस्त्यावरील स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर मोदींची सभा होणार आहे. त्यानंतर सायंकाळी ७.३० वाजता मोदी पुणे विमानतळाकडे रवाना होणार आहेत.

### खासगी अवकाश उड्डाणांना मनाई

अतिमहत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी खासगी अवकाश उड्डाणांना मनाई करण्याचे आदेश दिले आहेत. हे आदेश बुधवारी (दि. २५) मध्यरात्री १२ वाजल्यापासून ते गुरुवारी (दि. २६) रात्री १२ वाजेपर्यंत पुणे व पिंपरी-चिंचवड शहर तसेच ग्रामीण भागात पॅराग्लायडिंग, हॉट बलून सफारी, ड्रोन, मायक्रोलाइट एअरोप्लेन आदी प्रकारच्या अवकाश उड्डाणांना लागू असतील. या आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २२३ नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी यांच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### पंतप्रधान मोदी आणि पुणे मेट्रो

पुणे मेट्रो दोन कंपन्यांद्वारे बांधली जात आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन (महा-मेट्रो) जी दोन लाईन्स हाताळत आहे आणि पुणे मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी (PMRDA) जे टाटा समूहाच्या सहकार्याने तिसऱ्या लाईनचे व्यवस्थापन करत आहेत.

भूमिपूजन समारंभ आणि उद्घाटन समारंभासह पुणे मेट्रोच्या पाच कार्यक्रमांमध्ये मोदी वैयक्तिकरित्या सहभागी झाले आहेत. आणि एकदा कोलकाता येथून PMRDA मेट्रो मार्गाचे उद्घाटन केले आहे. पंतप्रधान मोदी यांनी 24 डिसेंबर 2016 रोजी कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर मेट्रोच्या मार्गाचे भूमिपुजन केले होते. डिसेंबर 2018 मध्ये बालेवाडी स्टेडियम येथे हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचा पायाभरणी करण्यासाठी ते आले होते. 6 मार्च 2022 रोजी, मोदींनी गरवारे कॉलेज ते वनाज मेट्रो मार्गाचे उद्घाटन केले होते.

### पार्किंगसाठी या जागा ताब्यात

» शहरातील नदीपात्र भिडे पूल, पाटील प्लाझा, न्यू इंग्लिश स्कूल- टिळक रोड, डी. पी. रोड- म्हात्रे पुलाजवळ, न्यू इंग्लिश स्कूल- रमणबाग, हरजीवन हॉस्पिटल- सावरकर चौक, पीएमपी मैदान- पूरम चौक, निलायम टॉकीज, विमलाताई गरवारे शाळा, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कटारिया माध्यमिक शाळा, मिनर्व्हा पार्किंग- मंडई व हमालवाडा पार्किंग या ठिकाणच्या जागा ताब्यात घेण्यात आल्या आहेत.

### कसा असेल पंतप्रधानांचा दौरा?

» मोदी गुरुवारी संध्याकाळी 5.35 वाजता पुणे विमानतळावर पोहोचतील
» मोदी पुणे विमानतळावरून संध्याकाळी 5.55 वाजता शिवाजीनगर मेट्रो स्टेशनवर पोहोचतील.
» शिवाजीनगर मेट्रो स्टेशन ते स्वारगेट पर्यंत मेट्रोला हिरवा झेंडा दाखवतील.
» मोदी मेट्रोने स्वारगेटला पोहोचतील.
» यानंतर पंतप्रधान मोदी स्वारगेट ते कात्रज या नवीन मेट्रो मार्गाचे भूमिपूजन करणार आहेत.
» पीएम मोदी स्वारगेटहून 6.30 वाजता एसपी कॉलेजच्या ठिकाणी पोहोचतील.
» पंतप्रधान संध्याकाळी 7.55 वाजता पुणे विमानतळावरून दिल्लीला रवाना होतील.

# त्या दोन गावांसाठी 300 कोटी द्यावेत

## उरुळी- फुरसुंगीबाबत माजी नगरसेवकांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

फुरसुंगी आणि देवाची उरुळी ही दोन गावे पुणे महापालिकेच्या हद्दीतून वगळून स्वतंत्र नगरपरिषद स्थापन करण्यात आली असून, या गावांमधील खर्चाचा भार महापालिकेवर टाकणे चुकीचे आहे. या कामांसाठी शासनाने महापालिकेस ३०० कोटींचे अनुदान तातडीने द्यावे, अशी मागणी माजी नगरसेवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

ही गावे वगळण्याचा निर्णय घटनाबाह्य असल्याचा आरोपही या नगरसेवकांनी निवेदनात केला आहे. माजी विरोधीपक्ष नेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, माजी नगरसेवक प्रशांत बधे यांनी ही मागणी केली आहे.




या निवेदनानुसार महापालिकेच्या हद्दीतून फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही गावे वगळण्याची नियोजनाच्या दृष्टीने गरज नव्हती; परंतु राजकीय दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून ही गावे वगळली आहेत. त्यावर नगरपरिषदेसाठी प्रशासकही नेमला आहे. नागरिकांना सुविधा देण्यासाठी भरपूर वेळ लागणार असल्यामुळे त्या सुविधांमध्ये खंड पडू नये, यासाठी याच्या देखभालीची जबाबदारी पुणे महापालिकेकडे सोपविण्यात आली आहे.

यापूर्वी असे कधीच एखादी स्वतंत्र नगरपरिषद करताना झालेले नाही. ज्या नागरिकांकडून आपण कर घेतो, त्यांच्या करातून जे कर देणार नाहीत किंवा जे महापालिकेच्या हद्दीमध्ये नाहीत, त्यांच्या सर्व पायाभूत सुविधांची दुरुस्ती व निगा राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकणे हे योग्य नाही, असे म्हटले आहे. त्यातच या गावात केलेल्या नगररचना योजनेचे जवळपास ११७१ कोटी रुपये हे महापालिकेने माफ केले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने या गावांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पुणे महापालिकेस ३०० कोटी रुपये द्यावेत, तसेच नगररचना योजनांसाठी माफ केलेले एक हजार कोटी रुपये टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करावेत, असेही निवेदनात नमूद केले आहे.